## आजचे पंचांग

रविवार दि. २२ फेब्रुवारी २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२७, शालिवाहन शक १९४७, विक्रम संवत २०८२, विश्वावसुनाम संवत्सर, उत्तरायण, वसंत ऋतु, फाल्गुन मास, शुक्लपक्ष, पंचमी सकाळी ११-१० पर्यंत नंतर षष्ठी तिथी, दिवस नक्षत्र– अश्विनी संध्याकाळी ५-५५ पर्यंत, योग– शुक्ल दुपारी १-०९ पर्यंत

दैनिक

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...

## शिखर धवनची नवी इनिंग

**पुणे** : शिखर धवनने आयुष्यात नवी इनिंग सुरू करत लेडी लव सोफीसोबत विवाहबंधनात अडकला. गेल्या आठवड्यापासून चर्चेत असलेला हा शाही विवाह थाटामाटात पार पडला. लग्नावेळी धवनने पांढऱ्या एम्ब्रॉयडरी शेरवानीसोबत राजेशाही पगडी व पन्ना माळ परिधान करून सर्वांचे लक्ष वेधले. तर सोफीने मनीष मल्होत्रा यांच्या कलेक्शनमधील आयवरी-ऑरेंज 3डी फुलांनी सजलेला लहंगा परिधान केला होता. मोत्यांचे भरतकाम आणि आकर्षक हेड वेलमुळे ती परीसारखी भासत होती.

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | रविवार, दि. २२ फेब्रुवारी, २०२६ | वर्ष - १ | अंक - १५० | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड

## सारांश वृत्त

### श्रीनगरमध्ये सीआरपीएफ वाहन नदीत कोसळले

**श्रीनगर** : श्रीनगर केंद्रीय राखीव पोलीस दलच्या वाहनाचा अपघात होऊन नऊ जवान जखमी झाल्याची घटना श्रीनगर येथे घडली. अहमदनगर परिसरातील डगपोरा-उमरहेर मार्गावर हा अपघात झाला. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने ते थेट नदीत कोसळले. अपघातानंतर स्थानिक प्रशासन आणि सुरक्षा यंत्रणा तत्काळ घटनास्थळी दाखल झाल्या. जखमी जवानांना तातडीने बाहेर काढून रुग्णालयात हलवण्यात आले. जखमी जवानांना सौरा येथील शेर-ए-कश्मीर इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेसमध्ये दाखल करण्यात आले आहे. सर्वांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. अपघाताचे नेमके कारण आणि वाहन नदीत कोसळण्यामागील परिस्थिती याबाबत पुढील तपास सुरू असल्याचेही सांगण्यात आले.

### ६१ वर्षीय आजींची दहावीची परीक्षा; जिद्दीला सलाम

**श्रीनगर** : हिंगोली जिल्ह्यातील कळमनुरी तालुक्यातील धानोरा गावातील ६१ वर्षीय फेमिदा बेगम निसार खां पठाण यांनी दहावीची परीक्षा देत शिक्षणाला वय नसते हे सिद्ध केले. त्यांनी महात्मा ज्योतिबा फुले विद्यालय येथे जाऊन मराठीचा पहिला पेपर दिला. घरातील जबाबदाऱ्या, नातवंडांचा सांभाळ आणि दैनंदिन कामे करत त्यांनी अभ्यास पूर्ण केला. या वयातही शिक्षणाची तळमळ आणि आत्मविश्वास जपणाऱ्या फेमिदा बेगम यांच्या जिद्दीचे सर्वत्र कौतुक होत आहे. अर्धवट शिक्षण राहिलेल्यांसाठी त्यांचा हा प्रयत्न प्रेरणादायी ठरत असून "इच्छा असेल तर मार्ग नक्की सापडतो" हा संदेश त्यांनी कृतीतून दिला आहे.

## उबाठा शिवसेना नेते अंबादास दानवे यांचा गंभीर आरोप; राज्यात राजकीय खळबळ

# मुख्यमंत्री सौर कृषी योजनेत 10 हजार कोटींचा महाघोटाळा?

■ दैनिक राज्य लोकतंत्र





### ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांचा गंभीर आरोप

- शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना संदर्भात मोठा वाद
- एनओपीएल, ग्रीन, एनएसीओएफ आणि ओनिक्स कंपन्यांवर बनावट बँक गॅरंटीचा आरोप
- आर्थिक गुन्हे शाखेकडे पाच गुन्हे दाखल झाल्याचा दावा
- महावितरण मधील अधिकाऱ्यांच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह
- सरकारकडून अद्याप अधिकृत सविस्तर प्रतिक्रिया नाही
- शेतकरी हिताच्या योजनेत अनियमिततेचा आरोप; पारदर्शक चौकशीची मागणी जोरात

**संभाजीनगर :** राज्यातील मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना संदर्भात तब्बल १० हजार कोटी रुपयांच्या कथित आर्थिक गैरव्यवहाराचा गंभीर आरोप समोर आला असून राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. विधानपरिषदेचे माजी विरोधी पक्षनेते तथा ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी पत्रकार परिषदेत हा आरोप करत काही खासगी कंपन्यांनी बनावट बँक हमीपत्रे सादर करून कंत्राटे मिळवल्याचा दावा केला.

दानवे यांच्या म्हणण्यानुसार, एनओपीएल, ग्रीन, एनएसीओएफ आणि ओनिक्स या कंपन्यांनी कथितपणे बनावट बँक गॅरंटीच्या आधारे सौर प्रकल्पांची कंत्राटे मिळवली. या प्रक्रियेत संबंधित अधिकाऱ्यांच्या संगनमताचाही संशय त्यांनी व्यक्त केला आहे. शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या या महत्त्वाकांक्षी योजनेत अनियमितता झाल्याचा आरोप असल्याने प्रकरण अधिक संवेदनशील ठरत आहे.

या प्रकरणात महावितरण मधील काही अधिकारी तसेच संबंधित कंपन्यांचे संचालक दिव्येश सावलिया आणि पी. सुरेश बाबू यांची नावेही दानवे यांनी घेतली. आर्थिक गुन्हे शाखेकडे या संदर्भात पाच गुन्हे दाखल झाल्याचा दावा करत त्यांनी सखोल आणि स्वतंत्र चौकशीची मागणी केली आहे. "शेतकऱ्यांच्या हितासाठी असलेल्या योजनेतच भ्रष्टाचार झाला असेल, तर तो अत्यंत गंभीर प्रकार आहे," असे दानवे म्हणाले.

दरम्यान, या आरोपांवर राज्य सरकारकडून अद्याप अधिकृत सविस्तर प्रतिक्रिया आलेली नाही. मात्र, या प्रकरणामुळे सौर कृषी योजनेच्या अंमलबजावणीबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोपांचे सत्र सुरू झाले असून येत्या काळात या प्रकरणाची चौकशी कोणत्या दिशेने जाते, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

राजकीय पातळीवर या मुद्द्याला मोठे महत्त्व प्राप्त झाले असून, प्रत्यक्षात गैरव्यवहार झाला आहे का, संबंधित अधिकाऱ्यांची भूमिका काय आहे आणि शासन याबाबत कोणती भूमिका घेते, याबाबत स्पष्टता येणे आवश्यक ठरले आहे. शेतकरी हिताच्या योजनांवरील विश्वास अबाधित ठेवण्यासाठी पारदर्शक चौकशीची मागणी आता जोर धरत आहे.

## नो गो... मेसेज आल्यानंतरही विमान का पुढं गेलं ?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा विमान अपघातात दुर्दैवी मत्यू झाला. त्यावर राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते रोहित पवार यांनी शनिवारी दिल्लीत पत्रकार परिषद घेउन अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. या पत्रकार परिषदेत त्यांनी जी व्हीएसआर कंपनीला मोठ्या लोकांचा सपोर्ट आहे. यातील काही लोक सत्तेत आहेत. या प्रकरणात राजकीय किंवा औद्योगिक षडयंत्र आहे. डीजीसीए च्या मोठ्या अधिकाऱ्यांचा यामध्ये समावेश असल्याचा आरोप करत देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हेच या प्रकरणाला न्याय देऊ शकतात असे त्यांनी म्हटले आहे. दरम्यान, या पत्रकार परिषदेत त्यांनी केंद्रीय मंत्री राम मोहन नायडू यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना विनंती करतो राम मोहन नायडू यांचा राजीनामा घ्यावा. तसेच राहुल गांधी यांनी हे प्रकरण हाती घ्यावे अशी विनंती त्यांनी केली. विमानात मोठ्या प्रमाणात इंधन होते. त्याचबरोबर एक्स्ट्राचे इंधन देखील विमानात होते. फ्युल इम्बॅलन्सचा मेसेज आल्यानंतर देखील विमान पुढं नेले होते. नो गो मेसेज आल्यानंतर विमान का पुढं गेले? असा सवाल आमदार रोहित पवार यांनी उपस्थित केला आहे. कॅप्टन अपूर्वा अग्रवाल आणि कॅप्टन लोकेश रामपाल यांचा का समावेश करण्यात आला आहे? यांना या विमानासंदर्भात काही माहिती आहे का? असा प्रश्न विचारत, ब्लॅक बॉक्स जळाला नाही यात मानवी हस्तक्षेप झाल्याचे त्यांनी म्हटले आहे. हे विमान 35 कोटीला विकत घेतले होते तर या विमानाचा 55 कोटी रूपयांचा विमा काढला होता, असे ते म्हणाले.

## कचरा व्यवस्थापनात कसूर केल्यास थेट फौजदारी कारवाई

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**दिल्ली :** स्वच्छ आणि आरोग्यदायी पर्यावरणाचा अधिकार हा मानवी जगण्याच्या अधिकाराचा अविभाज्य भाग आहे, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवत सर्वोच्च न्यायालयाने देशभरातील घनकचरा व्यवस्थापनाबाबत कठोर पावले उचलली आहेत. 1 एप्रिल 2026 पासून लागू होणाऱ्या नवीन नियमावलीची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी न्यायालयाने सर्व राज्यांना पॅन-इंडिया निर्देश जारी केले असून, आता कचरा व्यवस्थापनातील हलगर्जीपणा केवळ प्रशासकीय चूक न ठरता फौजदारी गुन्हा मानला जाणार आहे. न्यायमूर्ती पंकज मिथल आणि न्यायमूर्ती एस. व्ही. एन. भाटी यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले की, सध्याची पिढी कचरा व्यवस्थापनासाठी आणखी वाट पाहू शकत नाही. आर्थिक प्रगतीसोबतच कचऱ्याचे प्रमाणही वाढत असून, जर भारताला जागतिक तंत्रज्ञान क्षेत्रात आघाडीवर राहायचे असेल, तर कचरा व्यवस्थापनात 100 टक्के निकष पाळणे अनिवार्य आहे. विशेष म्हणजे, न्यायालयाने आता स्थानिक नगरसेवक, महापौर आणि प्रभाग सदस्यांवर स्त्रोत विलगीकरण मोहिमेचे नेतृत्व करण्याची वैधानिक जबाबदारी सोपवली आहे. तळागाळापर्यंत जनजागृती करण्यासाठी या नियमावलीचा स्थानिक भाषांमध्ये अनुवाद करण्याचे आणि शालेय अभ्यासक्रमात कचरा व्यवस्थापनाचा समावेश करण्याचे निर्देशही न्यायालयाने केंद्र सरकारला दिले आहेत.

## राजकारणात खळबळ; पोलिसांनी सापळा रचून कारवाई; २ सहाय्यकही ताब्यात

# भाजपा आमदाराला ५ लाखांची लाच घेताना रंगेहाथ पकडलं

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**गडग/बेंगळुरू** : चंद्रु लामाणी, कर्नाटकच्या शिरहट्टी मतदारसंघातून भाजपचे आमदार प्रतिनिधीत्व करणारे, आज लोकायुक्त पोलिसांनी रंगेहात लाच स्वीकारताना पकडले आहे. ही कारवाई लोकायुक्त पोलिस यांनी एका सापळा (trap) ऑपरेशनद्वारे केली.

प्राप्त माहितीनुसार, ५ लाख रुपये लाच स्वीकारताना लामाणी यांना अटक करण्यात आली आहे, ज्या रकमेचा भाग ११ लाख रुपयांच्या एकूण लाच मागणीचा भाग होता. हा पैसा एका सरकारी ठेकेदाराकडून मागितला जात होता, जो अंतर्गत रस्त्याजवळील रिटेनिंग वॉल बांधकामाशी संबंधित कामासाठी मंजुरी मिळवण्यासाठी दिला जाणार होता.

या सापळा कारवाईचा उगम एक तक्रारदार ठेकेदाराने केली. ठेकेदार विजय पूजार यांनी लोकायुक्त पोलिसांना तक्रार केली की, कामासाठी आवश्यक मंजुरी मिळवण्यासाठी त्यांना ११ लाख रुपयांची लाच द्यावी लागेल, त्यामुळे पोलिसांनी तपास केला आणि सापळा रचला.

आरोपी आमदारासोबतच त्यांचे दोन सहाय्यक — मन्जुनाथ वाल्मिकी व गुरु नाईक — यांनाही या प्रकरणात ताब्यात घेतले गेले असून, पुढील चौकशीसाठी त्यांची चौकशी सुरू आहे. पोलिसांनी हिरस्थित रक्कम आणि इतर पुरावे ताब्यात घेतले असून पुढील तपास चालू असल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

या गुन्ह्याची नोंद लाचलुचपत प्रतिबंधात्मक ॲक्ट, 1988 अंतर्गत संदर्भित कलमांतर्गत करण्यात आली आहे. पोलिसांचे म्हणणे आहे की, ही कारवाई नियमानुसार आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली आणि पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू आहे.

ही कारवाई कर्नाटकमधील भ्रष्टाचारविरोधी प्रयत्नांच्या पार्श्वभूमीवर महत्त्वपूर्ण मानली जात आहे. राज्यात राजकीय वर्तुळात यामुळे मोठी प्रतिक्रियाही उमटली आहे, कारण हा प्रकार भाजपा पक्षासाठी आणि सार्वजनिक विश्वासासाठी आव्हान ठरला आहे.

सद्यस्थितीत आरोपी आमदार आणि त्यांच्या दोन सहाय्यकांचे आरोग्य परीक्षणासाठी तपासणी करण्यात आली आहे आणि त्यांना नंतर न्यायालयात सादर करण्यात येणार आहे. या प्रकरणात सखोल चौकशी केल्यावर दोषी आढळल्यास कठोर कारवाई होण्याची शक्यता आहे.

## परीक्षेआधीच व्हॉट्सॲपवर बारावीचे फिजिक्स-केमिस्ट्री पेपर; नागपुरात खळबळ

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नागपूर** : बारावीच्या फिजिक्स आणि केमिस्ट्री विषयांचे प्रश्नपत्रिका परीक्षेपूर्वीच व्हॉट्सॲपवर प्रसारित झाल्याचा धक्कादायक प्रकार नागपुरातील सेंट उर्सुला परीक्षा केंद्रावर उघडकीस आला आहे. या घटनेमुळे शैक्षणिक क्षेत्रात मोठी खळबळ उडाली असून परीक्षेच्या गोपनीयतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सकाळी सुमारे साडेदहा वाजता संबंधित प्रश्नपत्रिका एका व्हॉट्सॲप गटावर प्रसारित झाल्या. या गटात २१ विद्यार्थी असल्याची माहिती समोर आली आहे. परीक्षा सुरू होण्यापूर्वीच पेपर उपलब्ध झाल्याने गैरप्रकाराचा संशय व्यक्त करण्यात आला. परीक्षा केंद्रावरील स्वच्छतागृहात एका विद्यार्थिनीने मोबाईलचा वापर केल्याचे आढळून आले. त्यानंतर तपास करताना प्रश्नपत्रिका गटावर शेअर झाल्याचा प्रकार समोर आला. या विद्यार्थिनीमार्फतच हा प्रकार उघडकीस आल्याचे सांगितले जात आहे. प्राथमिक तपासात खासगी शिकवणी वर्गातील एका शिक्षकाने पैशांच्या मोबदल्यात प्रश्नपत्रिका पुरवल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. या दृष्टीने पोलिसांकडून चौकशी सुरू असून संबंधित शिक्षकासह इतर काही जणांच्या भूमिकेची तपासणी केली जात आहे. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून सायबर पथकाच्या मदतीने व्हॉट्सॲप गटातील संदेश, वेळा आणि संबंधित क्रमांकांची छाननी केली जात आहे. प्रश्नपत्रिका नेमक्या कोणत्या टप्प्यावरून बाहेर गेल्या, याचा शोध घेण्यावर भर दिला जात आहे. दरम्यान, शिक्षण मंडळाने या घटनेची गंभीर दखल घेत परीक्षा केंद्रावरील सर्व कर्मचाऱ्यांची तात्काळ बदली केली आहे. केंद्रप्रमुखांसह पर्यवेक्षक आणि इतर संबंधित कर्मचाऱ्यांकडून स्पष्टीकरण मागवण्यात आले आहे.

प्रश्नपत्रिका गळतीचा हा प्रकार समोर आल्यानंतर विद्यार्थ्यांमध्ये आणि पालकांमध्ये संतापाची भावना आहे. प्रामाणिकपणे परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांवर अन्याय झाल्याची भावना व्यक्त केली जात आहे. संबंधित पेपर रद्द करून पुन्हा परीक्षा घेण्याबाबत निर्णय होणार का, याकडेही सर्वांचे लक्ष लागले आहे. सध्या पोलिसांकडून सखोल तपास सुरू असून गळतीमागील संपूर्ण साखळी उघड करण्याचा प्रयत्न केला जात आहे. दोषींवर कडक कारवाई करण्यात येईल, असे संकेत प्रशासनाकडून देण्यात आले आहेत.

## अजित पवार अपघातप्रकरणी संशय निर्माण करू नका

**नागपूर :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाताची चौकशी सुरू असताना पोलिस आणि गुप्तचर यंत्रणांवर अविश्वास दाखवू नये, असे मत भाजपचे ज्येष्ठ नेते आणि माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केले. काही ठोस पुरावे असतील तर ते थेट बारामती पोलिस ठाण्यात जाऊन सादर करावेत, अशी सूचना त्यांनी केली. व्हिएसआर विमान कंपनीशी संबंध असल्याच्या कारणावरून केंद्रीय नागरी उड्डयन मंत्र्यांचा राजीनामा मागण्यात काहीही अर्थ नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. "शरद पवार यांचेही अनेकांशी जवळचे संबंध आहेत. त्यावरून उद्या कुणीही वेगळा संशय व्यक्त करू शकतो का?" असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

# मुदत संपली तरी खुर्ची कायम!

## ग्रामपंचायतींमध्ये सातत्य राखण्यासाठी शासनाचा निर्णय

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : राज्यातील मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींबाबत राज्य सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. ज्या ग्रामपंचायतींची मुदत २८ फेब्रुवारीपर्यंत संपत आहे, त्या ठिकाणी विद्यमान सरपंचालाच प्रशासक म्हणून नियुक्त करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागाने यासंदर्भात अधिसूचना जारी केली आहे. या निर्णयामुळे ग्रामपातळीवरील प्रशासनात सातत्य राहणार असून अचानक बदलामुळे निर्माण होणारी प्रशासकीय पोकळी टळणार आहे. निवडणूक प्रक्रियेला विलंब झाल्यास कामकाज ठप्प होऊ नये आणि ग्रामपंचायतींचे दैनंदिन व्यवहार सुरळीत सुरू राहावेत, हा या निर्णयामागील उद्देश असल्याचे शासनाने स्पष्ट केले आहे. राज्यातील अनेक ग्रामपंचायतींची मुदत २८ फेब्रुवारीला संपत आहे. काही ठिकाणी प्रशासकीय अडचणींमुळे निवडणुका वेळेत पूर्ण होऊ शकल्या नाहीत. अशा पार्श्वभूमीवर प्रशासनात अनिश्चितता निर्माण होऊ नये, म्हणून हा निर्णय घेण्यात आल्याचे सांगण्यात येते. यापूर्वी मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींवर बाहेरील अधिकाऱ्यांची प्रशासक म्हणून नियुक्ती केली जात होती. त्यामुळे स्थानिक पातळीवर असंतोष आणि गोंधळाचे वातावरण निर्माण होत असल्याच्या तक्रारी होत्या. नव्या निर्णयामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कामकाजात स्थैर्य येईल आणि विकासकामांना गती मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. अधिसूचनेनुसार, प्रशासकांची नियुक्ती सहा महिन्यांच्या कालावधीसाठी किंवा ग्रामपंचायत स्थापनेची निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत, यापैकी जे आधी असेल त्या कालावधीसाठी केली जाईल. गरज भासल्यास हा कालावधी वाढवण्याचा अधिकार शासनाकडे राखीव ठेवण्यात आला आहे.

## भारतासाठी १०, १३.५ की १८ टक्के दर?

# अमेरिकन आयात शुल्काबाबत संभ्रम कायम!

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**नवी दिल्ली :** अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर भारतावर लागू होणाऱ्या आयात शुल्काबाबत मोठा गोंधळ निर्माण झाला आहे. कधी ५० टक्के, कधी २५, मग १८ आणि आता थेट १० टक्के दर जाहीर करण्यात आला आहे. सतत बदलणाऱ्या आकड्यांमुळे भारतीय निर्यातदार पुन्हा एकदा संभ्रमात सापडले आहेत. गेल्या काही आठवड्यांत भारतासाठी आयात शुल्क ५० टक्क्यांवरून १८ टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आले होते. रशियाकडून तेल खरेदी केल्याबद्दल भारतावर लावलेला अतिरिक्त २५ टक्के दंडात्मक आयात शुल्कही मागे घेण्यात आला होता. त्यामुळे व्यापार क्षेत्रात काहीसा दिलासा निर्माण झाला होता. मात्र, शुक्रवारी अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वाचा निर्णय देत, शांततेच्या काळात आणीबाणी अधिकार कायद्याचा वापर करून आयात शुल्क लागू करता येणार नाही, असे स्पष्ट केले. या निकालामुळे भारतावर लावलेला १८ टक्के दर कायदेशीरदृष्ट्या अडचणीत आला आहे. या निर्णयामुळे भारत पुन्हा जुन्या 'सर्वाधिक प्राधान्य देश' दर्जावर, सुमारे ३.५ टक्के आयात शुल्कावर येऊ शकला असता. मात्र ट्रम्प यांनी तत्काळ पर्यायी मार्ग स्वीकारला. न्यायालयाच्या निकालानंतर अवघ्या एका दिवसात ट्रम्प यांनी क्वचित वापरल्या जाणाऱ्या एका विशेष तरतुदीचा आधार घेत भारतासह सर्व देशांवर १० टक्के तात्पुरते आयात शुल्क लागू करण्याचा आदेश दिला. हा दर २४ फेब्रुवारीपासून लागू होणार असून पुढील १५० दिवस वैध राहणार आहे. त्यानंतर काँग्रेसची मंजुरी आवश्यक असेल. व्हाईट हाऊसच्या अधिकृत माहितीनुसार, अमेरिकेने ज्या देशांशी करार केले आहेत त्यांच्यासाठी सध्या १० टक्के तात्पुरते आयात शुल्क लागू राहील. त्यामुळे भारताला जुन्या ३.५ टक्के दरासोबत नव्या १० टक्के दराची भर पडून एकूण सुमारे १३.५ टक्के आयात शुल्क द्यावे लागू शकते. मात्र याबाबतही स्पष्टता नसल्याने संभ्रम कायम आहे. दरम्यान, ट्रम्प यांनी पत्रकारांशी बोलताना भारतासाठी आधी ठरवलेला १८ टक्के दरच लागू राहील, असा दावा केला. त्यामुळे पुन्हा एकदा अनिश्चितता वाढली. व्हाईट हाऊसने मात्र कायदेशीरदृष्ट्या सध्या १० टक्के आयात शुल्कच लागू होईल, असे स्पष्ट केले आहे. स्टील आणि ॲल्युमिनियमवरील ५० टक्के आयात शुल्क तसेच काही वाहन सुट्या भागांवरील २५ टक्के आयात शुल्क कायम राहणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे काही क्षेत्रांवरील ताण कायम आहे. या पार्श्वभूमीवर भारत सरकारचे शिष्टमंडळ लवकरच वॉशिंग्टनला जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. अंतिम दर, प्रस्तावित व्यापार करार आणि निर्माण झालेली कायदेशीर गुंतागुंत यावर चर्चा होण्याची अपेक्षा आहे. तोपर्यंत भारतीय निर्यातदारांसाठी सध्याचा १० टक्के दर, म्हणजे अंदाजे १३.५ टक्के प्रभावी आयात शुल्क, तात्पुरता दिलासा मानला जात आहे. विशेषतः वस्त्रोद्योग, हिरे-दागिने आणि इतर ग्राहकाभिमुख क्षेत्रांना याचा काहीसा फायदा होऊ शकतो. अमेरिका हा भारताचा सर्वात मोठा निर्यात बाजार असल्याने या निर्णयांचा थेट परिणाम भारतीय उद्योगांवर होणार आहे. दुसरीकडे, ट्रम्प प्रशासन पुन्हा १८ टक्के आयात शुल्क लागू करण्यासाठी कायदेशीर पर्यायांचा विचार करत असल्याची माहिती अमेरिकेतील सूत्रांनी दिली आहे. ट्रम्प यांनी भारतासोबत करार झाल्याचा दावा करत १८ टक्के दर लागू होईल, असे संकेत दिले असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबद्दल सकारात्मक भूमिका व्यक्त केली

## १ एप्रिलपासून टोल नाक्यांवर रोख व्यवहार बंद

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : राष्ट्रीय महामार्गांवरून प्रवास करणाऱ्या वाहनधारकांसाठी महत्त्वाची बातमी आहे. केंद्र सरकारने टोल नाक्यांवरील रोख व्यवहार पूर्णपणे बंद करण्याचा निर्णय घेतला असून १ एप्रिल २०२६ पासून देशभरात ही अंमलबजावणी होणार आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आता संपूर्णपणे डिजिटल व्यवहार पद्धतीकडे वळणार आहे. रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने जारी केलेल्या पत्रकानुसार, १ एप्रिलपासून राष्ट्रीय महामार्गांवरील कोणत्याही टोल नाक्यावर रोख रक्कम स्वीकारली जाणार नाही. वाहनधारकांना टोल भरण्यासाठी फास्टॅग किंवा युपीआय या डिजिटल पर्यायांचाच वापर करावा लागणार आहे. टोल संकलनात पारदर्शकता आणणे, वाहतूक अधिक वेगवान करणे आणि टोल नाक्यांवरील गर्दी कमी करणे हा या निर्णयामागील मुख्य उद्देश असल्याचे मंत्रालयाने स्पष्ट केले आहे. डिजिटल व्यवहारामुळे टोल नाक्यांवरील रांगा कमी होतील आणि वाहनांचा प्रवास अधिक सुरळीत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. सध्या देशात फास्टॅगचा वापर ९८ टक्क्यांहून अधिक वाहनांमध्ये होत आहे. बहुतांश वाहनांवरील फास्टॅगमुळे टोल रक्कम आपोआप वजा होते.

ज्यांच्याकडे फास्टॅग उपलब्ध नाही, त्यांच्यासाठी युपीआयचा पर्याय ठेवण्यात आला आहे. रोख व्यवहार करताना सुट्ट्या पैशांवरून वाद होणे, वेळेचा अपव्यय आणि परिणामी वाहतूक कोंडी होणे, या समस्या वारंवार समोर येत होत्या. पूर्णपणे डिजिटल प्रणाली लागू झाल्यास वाहनांचा वेग कायम राहील, इंधनाची बचत होईल आणि प्रवाशांचा वेळ वाचेल, असे प्रशासनाचे मत आहे.

## संपादकीय

# मल्ल्याच्या प्रत्यार्पणाचा गुंता : न्यायप्रणालीसमोरील आव्हान

**भारतीय दृष्टिकोनातून पाहता, मल्ल्या हा फरारी आरोपी आहे. देशातील न्यायालयीन चौकशीपासून दूर राहून तो परदेशात आश्रय घेत आहे, अशी धारणा आहे. भारतीय न्यायप्रक्रियेनुसार, एखादी व्यक्ती न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रात नसल्यास तिला न्यायालयीन सवलती वा घटनात्मक संरक्षणाची मागणी करण्याचा पूर्ण अधिकार मिळत नाही. त्यामुळे 'प्रथम हजर व्हा, मग दिलासा मागा' हा भारतीय तत्त्वाचा गाभा आहे.**

भारतातील बँकांमधील हजारो कोटींच्या आर्थिक अनियमिततेनंतर देश सोडून गेलेला उद्योगपती विजय मल्ल्या पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे. भारतात परतण्याबाबत मुंबई उच्च न्यायालय यांनी विचारणा केली असता, त्याने ब्रिटनमधील न्यायालयीन प्रक्रियेचे कारण पुढे करत आपणास परतता येत नसल्याचे स्पष्ट केले. या उत्तरातून केवळ एका व्यक्तीचे प्रकरण समोर येत नाही, तर दोन वेगवेगळ्या न्यायप्रणालींतील तत्त्वभेद, प्रत्यार्पण करारातील गुंतागुंत आणि जागतिकीकरणाच्या युगातील कायद्याच्या मर्यादा उघड होतात.

मात्र ब्रिटिश न्यायप्रणालीचा दृष्टिकोन वेगळा आहे. तेथील कायद्यानुसार, जर एखादी व्यक्ती न्यायालयीन नियंत्रणाखाली असेल, तर ती स्वतःच्या इच्छेने देश सोडू शकत नाही. म्हणजेच भारताच्या दृष्टीने तो फरारी असला, तरी ब्रिटनच्या दृष्टीने तो न्यायालयीन प्रक्रियेत गुंतलेला आहे. हीच दरी प्रत्यार्पण प्रक्रियेला अधिक क्लिष्ट बनवते.

भारत आणि युनायटेड किंगडम यांच्यात प्रत्यार्पण करार अस्तित्वात आहे. त्या करारानुसार गंभीर आर्थिक गुन्ह्यांतील आरोपींचे प्रत्यार्पण होऊ शकते. मल्ल्याच्या बाबतीत ब्रिटनमधील न्यायालयांनी प्रत्यार्पणास मान्यता दिल्याची बातमी यापूर्वी समोर आली होती; परंतु त्यानंतर विविध अपील, कायदेशीर हरकती आणि तथाकथित 'गोपनीय कायदेशीर बाबी' यांमुळे ही प्रक्रिया अद्याप पूर्ण झालेली नाही. म्हणजेच, करार असला तरी त्याची अंमलबजावणी ही केवळ राजनैतिक नव्हे, तर न्यायालयीन कसोट्यांवर अवलंबून असते.

मल्ल्याने ब्रिटनमध्ये मांडलेले मुद्देही लक्षणीय आहेत. भारतातील तुरुंगांची परिस्थिती, आरोग्यविषयक समस्या, राजकीय सूडबुद्धीची शक्यता, न्याय्य सुनावणीविषयी शंका आणि मानवाधिकारांचे प्रश्न—या सर्व बाबींचा आधार घेत त्याने प्रत्यार्पणास विरोध केला आहे. यामुळे ब्रिटिश न्यायालयाला केवळ गुन्ह्याचे स्वरूप पाहायचे नसून, आरोपीला प्रत्यार्पणानंतर कोणत्या परिस्थितीला सामोरे जावे लागेल, याचाही विचार करावा लागतो. मानवाधिकारांच्या आंतरराष्ट्रीय निकषांमुळे प्रत्यार्पण प्रक्रिया अधिक संवेदनशील बनते.

या प्रकरणातून एक मोठा प्रश्न समोर येतो—गुन्हा एका देशात आणि आरोपी दुसऱ्या देशात असल्यास 'अंतिम न्यायाधिकार' कोणाचा? जागतिकीकरणामुळे अर्थव्यवस्था, व्यवहार आणि तंत्रज्ञान सीमारेषा ओलांडून गेले आहेत; परंतु न्यायव्यवस्था अद्याप राष्ट्रीय चौकटीत अडकलेली आहे. आर्थिक फसवणूक, सायबर गुन्हे, मनी लॉन्डरिंग यांसारखे गुन्हे अनेक देशांच्या सीमांतून फिरतात. अशा वेळी एखाद्या आरोपीने एका देशातील कायद्याचा आधार घेऊन दुसऱ्या देशातील कारवाई लांबवणे शक्य होते. मल्ल्याच्या प्रकरणात 'कालहरण' ही रणनीती स्पष्टपणे दिसून येते. विविध अपील, पुनर्विचार अर्ज, आरोग्यविषयक कारणे आणि प्रक्रियात्मक हरकती—या माध्यमातून प्रत्यार्पण प्रक्रिया वर्षानुवर्षे लांबली आहे. हे केवळ एका व्यक्तीपुरते मर्यादित नाही. परदेशात आश्रय घेतलेल्या अनेक आर्थिक गुन्हेगारांच्या बाबतीत हाच पॅटर्न दिसून येतो. त्यामुळे न्याय मिळवण्याची प्रक्रिया संथ आणि खर्चिक ठरते.

आधुनिक काळातील गुन्ह्यांचे स्वरूपही झपाट्याने बदलत आहे. डिजिटल व्यवहार, आंतरराष्ट्रीय बँकिंग व्यवस्था आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या जाळ्यामुळे आर्थिक गुन्हे अधिक गुंतागुंतीचे झाले आहेत. अशा गुन्ह्यांचा तपास, पुरावे संकलन आणि न्यायालयीन सादरीकरण यासाठी विविध देशांतील संस्थांमध्ये समन्वय आवश्यक ठरतो. परंतु प्रत्येक देशाचे कायदे, पुराव्याचे निकष आणि मानवाधिकारांची व्याख्या वेगवेगळी असल्याने एकसंध कारवाई कठीण होते.

यावर उपाय काय? प्रथम, प्रत्यार्पण करार अधिक स्पष्ट आणि परिणामकारक करण्याची गरज आहे. दुसरे म्हणजे, आंतरराष्ट्रीय न्यायसहकार्य मजबूत करणे आवश्यक आहे. संयुक्त तपास यंत्रणा, डिजिटल पुराव्यांची देवाणघेवाण आणि न्यायालयीन प्रक्रियेत परस्पर मान्यता—या बाबींचा विस्तार करावा लागेल. तिसरे म्हणजे, आरोपींच्या मानवाधिकारांचा सन्मान राखत न्यायप्रक्रिया वेगवान करण्यासाठी जागतिक स्तरावर मानक नियमावली विकसित करणे आवश्यक आहे. मल्ल्याच्या प्रकरणातून भारतीय न्यायव्यवस्थेसमोरही काही प्रश्न उभे राहतात. देशातील तुरुंग व्यवस्था, न्यायालयीन विलंब आणि राजकीय हस्तक्षेपाविषयीच्या आरोपांवर ठोस सुधारणा करणे गरजेचे आहे. कारण प्रत्यार्पण प्रक्रियेत संबंधित देशातील न्यायप्रणालीची विश्वसनीयता हा निर्णायक घटक ठरतो. जर भारताने आपल्या संस्थांची पारदर्शकता आणि कार्यक्षमता अधिक भक्कम केली, तर अशा हरकतींना कमी वाव राहील.

शेवटी, मल्ल्याचे प्रत्यार्पण हा केवळ एका व्यक्तीचा प्रश्न नाही; तो जागतिक न्यायप्रणालीसमोरील व्यापक आव्हानाचे प्रतीक आहे. अर्थव्यवस्था जागतिक होत असताना न्यायाची चौकटही तितकीच समन्वित आणि सक्षम व्हावी लागेल. अन्यथा, गुन्हेगार सीमारेषांच्या पलीकडे आश्रय घेत राहतील आणि न्यायप्रक्रिया वर्षानुवर्षे अडकत राहील. नव्या काळातील गुन्ह्यांना तोंड देण्यासाठी नव्या प्रकारच्या जागतिक सहकार्याची गरज आहे. न्याय हा केवळ राष्ट्रीय संकल्पना न राहता आंतरराष्ट्रीय जबाबदारी बनला आहे. मल्ल्याच्या प्रत्यार्पणाचा तिढा सुटेल की नाही, हे काळच ठरवेल; परंतु या प्रकरणाने जागतिक न्यायव्यवस्थेतील उणिवा स्पष्ट केल्या आहेत. त्या भरून काढण्यासाठी देशांनी आता ठोस पावले उचलणे हीच काळाची मागणी आहे.

# खेळाडूंच्या आवाहनातून पाकिस्तानातील सत्तासंघर्षाची कटू वास्तवता उघड

**» युरोपियन संघाच्या हवामान सल्लागार मंडळाने २१०० पर्यंत २.८ अंश सेल्सिअस तापमानवाढीची तयारी करण्याचा दिलेला इशारा ही निव्वळ वैज्ञानिक सूचना नाही; तर ती राजकीय आणि आर्थिक वास्तवाची जाणीव करून देणारी घंटा आहे. केवळ उत्सर्जनकपात पुरेशी ठरणार नाही, तर लवचिकतेची उभारणी अपरिहार्य ठरणार आहे.**



पाकिस्तानचे माजी पंतप्रधान आणि क्रिकेट संघाचे माजी कर्णधार इम्रान खान यांच्या तुरुंगवासातील परिस्थितीबाबत जागतिक क्रिकेटविश्वातील दिग्गजांनी व्यक्त केलेली चिंता ही केवळ एका व्यक्तीपुरती मर्यादित नाही; ती पाकिस्तानातील सत्तासंघर्ष, लष्करी वर्चस्व आणि राजकीय सूडभावनेचे गंभीर चित्र उभे करते. इम्रान यांना योग्य वैद्यकीय उपचार आणि सन्मानजनक वागणूक मिळावी, अशी मागणी करणाऱ्या आंतरराष्ट्रीय खेळाडूंच्या आवाहनाने या प्रकरणाला नवे वळण मिळाले आहे. विशेष म्हणजे, अंतर्गत राजकारणापासून जाणीवपूर्वक दूर राहणारे भारताचे महान फलंदाज सुनील गावसकर आणि कपिल देव, तसेच वेस्ट इंडिजचे दिग्गज क्लाइव्ह लॉइड आणि ऑस्ट्रेलियाचे माजी कर्णधार ॲलन बॉर्डर यांनी व्यक्त केलेली चिंता परिस्थितीचे गांभीर्य अधोरेखित करते. जे खेळाडू सहसा कोणत्याही देशाच्या अंतर्गत राजकारणात भाष्य करत नाहीत, ते इम्रान यांच्या आरोग्याविषयी आणि तुरुंगातील कथित अमानवी वागणुकीविषयी बोलू लागले, म्हणजेच परिस्थिती खरोखरच चिंताजनक आहे.

इम्रान खान हे केवळ राजकारणी नाहीत; ते पाकिस्तानच्या क्रीडा इतिहासातील एक तेजस्वी पर्व आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली पाकिस्तानने १९९२ मध्ये क्रिकेट विश्वचषक जिंकला. त्यांनी संघाला एकजूट, आत्मविश्वास आणि लढाऊ वृत्ती दिली. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात करिष्मा, नेतृत्व आणि राष्ट्रवाद यांचे मिश्रण होते. याच लोकप्रियतेच्या बळावर त्यांनी राजकारणात प्रवेश केला आणि पाकिस्तान तहरीक-ए-इन्साफ या पक्षाला सत्तेपर्यंत नेले.

मात्र, पाकिस्तानातील राजकारण हे नेहमीच लष्करी सत्ताकेंद्राशी गुंतलेले राहिले आहे. देशात अनेकदा लष्करी हुकूमशाही आली; काही माजी पंतप्रधानांना फाशी देण्यात आली, तर काहींची हत्या झाली. या पार्श्वभूमीवर इम्रान यांची स्थिती अधिकच अस्वस्थ करणारी वाटते. त्यांनी लष्कराच्या कथित हस्तक्षेपाला आव्हान दिले, विशेषतः सध्याचे लष्करप्रमुख असीम मुनीर यांच्याशी उघड संघर्ष पत्करला. हेच त्यांच्या राजकीय पतनाचे एक मोठे कारण ठरल्याचे विश्लेषक मानतात.

इम्रान खान यांच्यावर भ्रष्टाचार, सत्तेचा गैरवापर आणि हिंसाचार भडकवल्याचे आरोप आहेत. त्यांच्या समर्थकांच्या मते हे आरोप राजकीय सूडातून लावले गेले आहेत. निवडणुकांदरम्यान त्यांच्या पक्षाची कोंडी, उमेदवारांवर दबाव आणि निकालांबाबत व्यक्त झालेल्या शंका या सर्व घटनांमुळे पाकिस्तानातील लोकशाही प्रक्रियेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. इम्रान समर्थकांचा दावा आहे की निवडणुका 'फार्स' ठरल्या आणि लष्कराच्या पाठबळावर सत्ता टिकवली गेली.

तुरुंगवासातील परिस्थितीबाबतचे आरोप अधिक गंभीर आहेत. इम्रान यांना दीर्घकाळ एकांतवासात ठेवण्यात आल्याचे, त्यांच्या आरोग्याच्या तक्रारींकडे दुर्लक्ष केल्याचे आणि कुटुंबीयांना भेटण्यास अडथळे आणल्याचे वृत्त आहे. डोळ्यांच्या विकाराविषयी त्यांनी केलेल्या तक्रारीकडे दुर्लक्ष झाल्याने अंधत्वाचा धोका असल्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवरच जागतिक क्रिकेटपटूंनी तज्ज्ञ डॉक्टरांकडून उपचाराची मागणी केली आहे.

या प्रकरणात दोन स्तर स्पष्ट दिसतात—एक कायदेशीर आणि दुसरा मानवी. भ्रष्टाचार किंवा हिंसाचाराचे आरोप सिद्ध होणे अथवा न होणे हा न्यायालयीन विषय आहे. परंतु एखाद्या माजी पंतप्रधानाला तुरुंगात सन्मानजनक वागणूक मिळावी, हा मूलभूत मानवी अधिकारांचा प्रश्न आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर मानवाधिकारांचे निकष स्पष्ट आहेत. कोणत्याही कैद्याला योग्य वैद्यकीय सेवा, कुटुंबीयांशी संपर्क आणि मानसिक आरोग्याची काळजी मिळणे अपेक्षित असते.

काही दिवसांपूर्वी इम्रान यांच्या मृत्यूच्या अफवा पसरल्या. त्यांच्या बहिणीलाही भेटण्यास परवानगी नाकारल्याची माहिती समोर आली. या घटनांमुळे त्यांच्या समर्थकांमध्ये संताप वाढला आहे. पाकिस्तानभर निदर्शने सुरू असून, लोकभावनेचे दमन किती काळ करता येईल, हा प्रश्न उपस्थित झाला आहे.

जागतिक स्तरावर पाहता, खेळ आणि राजकारण यांचा संबंध गुंतागुंतीचा असतो. खेळाडू अनेकदा सामाजिक किंवा मानवी प्रश्नांवर आवाज उठवतात; परंतु एखाद्या देशाच्या राजकीय कैद्याबाबत थेट आवाहन करणे दुर्मीळच असते. गावसकर, कपिल देव, लॉइड आणि बॉर्डर यांच्यासारख्या दिग्गजांनी पुढे येणे म्हणजे परिस्थिती सामान्य चौकटीबाहेर गेल्याचे लक्षण मानावे लागेल.

# पिंपरी चिंचवड महापालिकेत दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर जयंती उत्साहात

## मराठी पत्रकारितेचे आद्य प्रणेते; 'दर्पण'मुळे सुरू झाला नव्या युगाचा अध्याय – महापौर रवि लांडगे

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी :** मराठी पत्रकारितेचे जनक म्हणून ओळखले जाणारे बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने उत्साहात साजरी करण्यात आली.

महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत आयोजित कार्यक्रमात महापौर रवि लांडगे यांनी जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, मराठी भाषेतून समाजजागृती, विवेकशील विचार आणि सत्यनिष्ठ पत्रकारितेची मुहूर्तमेढ रोवण्याचे कार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी केले. अनेक भाषांवर प्रभुत्व असलेल्या जांभेकर यांनी ६ जानेवारी १८३२ रोजी 'दर्पण' हे मराठी वृत्तपत्र सुरू करून मराठी पत्रकारितेचा नवा अध्याय लिहिला.

'दर्पण'च्या माध्यमातून सामाजिक प्रश्नांवर भाष्य करत लोकमत घडविण्याचे कार्य त्यांनी केले. पत्रकारितेला सामाजिक जबाबदारीची जाणीव देत विवेकवादी दृष्टिकोन रुजविण्यात त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण असल्याचे महापौरांनी नमूद केले.

# महानगरपालिकाकडून अनधिकृत बांधकामांवर कारवाईसाठी विशेष

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पिंपरी, २० फेब्रुवारी २०२६ : शहरातील अनधिकृत बांधकामे व मिळकतींवर प्रभावी आणि कायदेशीर कारवाई करता यावी, यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कायदा विभाग व अतिक्रमण विभागाच्या वतीने अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी विशेष प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या सूचनेनुसार आयोजित ही कार्यशाळा पिंपरी येथील मुख्यालयातील दिवंगत महापौर मधुकर पवळे सभागृह येथे पार पडली. यामध्ये क्षेत्रीय अधिकारी, कार्यकारी अभियंते, कनिष्ठ अभियंते, बीट निरीक्षक तसेच संबंधित कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

कार्यशाळेदरम्यान अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर व उपायुक्त राजेश आगळे यांनी मार्गदर्शन करत अनधिकृत बांधकामांविरोधातील कारवाई अधिक प्रभावी, पारदर्शक व कायदेशीरदृष्ट्या भक्कम करण्यावर भर दिला. अतिरिक्त कायदा सल्लागार देवेंद्र दीक्षित यांनी नोटीस देण्याची अचूक कार्यपद्धती, पंचनामा तयार करण्याची प्रक्रिया, लागू असलेल्या कायदेशीर तरतुदी तसेच एम.आर.टी.पी. अधिनियम व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदींचा योग्य वापर याबाबत सविस्तर माहिती दिली. या प्रशिक्षणामुळे कारवाईदरम्यान होणाऱ्या त्रुटी कमी होऊन एकसंधता व कार्यक्षमता वाढेल, तसेच महापालिकेची कारवाई न्यायालयीन स्तरावर अधिक सक्षमपणे टिकून राहील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# 'छत्रपती शिवाजी महाराजांचा एक विचार जरी आत्मसात केला तरी यश निश्चित' – अविनाश भारती



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** 'छत्रपती शिवाजी महाराजांचा एक जरी विचार आत्मसात केला, तरी प्रत्येक व्यक्ती आपल्या आयुष्यात यशस्वी होऊ शकते,' असे प्रतिपादन सुप्रसिद्ध व्याख्याते अविनाश भारती यांनी केले. चिंचवड येथील संभाजीनगर येथे आयोजित 'आदर्श राजे छत्रपती शिवाजी महाराज' या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते.

महापालिकेच्या वतीने १५ ते २१ फेब्रुवारी दरम्यान 'छत्रपती शिवाजी महाराज विचार प्रबोधन पर्व २०२६' अंतर्गत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. महापौर रवि लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर आणि आयुक्त श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येत आहे.कार्यक्रमास माजी महापौर मंगला कदम, नगरसदस्या अनुराधा गोरखे, सुप्रिया चांदगुडे, नगरसदस्य कुशाग्र कदम, उपायुक्त अण्णा बोदडे तसेच साई किरण मित्र मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमास साई किरण मित्र मंडळाचे सहकार्य लाभले.

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्वसाधारण सभेत स्थायी व विषय समिती सदस्यांची निवड

## नवनियुक्त सदस्यांना महापौर रवि लांडगे यांच्याकडून शुभेच्छा

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आज झालेल्या सर्वसाधारण सभेत स्थायी समितीसह विविध विषय समित्यांवरील सदस्यांची निवड करण्यात आली. महापौर रवि लांडगे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या सभेत पक्षीय बलाबलानुसार सदस्यांची नियुक्ती जाहीर करण्यात आली.

सभेत स्थायी समितीबरोबरच विधी, शहर सुधारणा, शिक्षण, महिला व बालकल्याण तसेच क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समित्यांवर सदस्य निवडीचा विषय सभापटलावर ठेवण्यात आला होता. विविध पक्षांच्या गटनेत्यांनी विषय समितीनिहाय बंद लिफाफ्यात नावे पिठासीन अधिकारी रवि लांडगे यांच्याकडे सादर केली. त्यानंतर समितीनिहाय सदस्यांची नावे जाहीर करण्यात येऊन निवड घोषित करण्यात आली.

महानगरपालिकेच्या विकासात्मक, सामाजिक व प्रशासकीय कामकाजात या समित्यांची भूमिका महत्त्वाची असणार असून, नव्याने निवड झालेल्या सदस्यांकडून शहराच्या सर्वांगीण विकासासाठी सकारात्मक कार्य होईल, असा विश्वास महापौरांनी व्यक्त केला.

**स्थायी समिती**

**भारतीय जनता पार्टी :**

अभिषेक बारणे, शालिनी गुजर, मनिषा चिंचवडे, संदीप कस्पटे, सारीका गायकवाड, योगिता नागरगोजे, कृष्णा सुरकुले, शीतल वर्नेकर, अर्चना करांडे, मधुरा शिंदे, बाबासाहेब त्रिभुवन

**राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी :**

सविता आसवानी, संतोष कोकणे, संदीप वाघेरे, विकास साने

**शिवसेना :**

सुलभा उबाळे

**विधी समिती भारतीय जनता पार्टी :**

ज्ञानेश्वर जगताप, विनायक गायकवाड, कुंदा भिसे, सुजाता बोराटे, श्रुती डोळस, कुशाग्र कदम

**राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी :**

शेखर चिंचवडे, वर्षा जगताप, तुषार सहाणे

**शहर सुधारणा समिती भाजपा :**

अर्चना सस्ते, विनोद नढे, कुणाल वाव्हळकर, संजय (नाना) काटे, सुहास कांबळे, उत्तमराव केंदळे

**राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी :**

डॉ. वैशाली घोडेकर-लोंढे, अनंत कोऱ्हाळे, वैशाली काळभोर

## इंडियन सोशल मूव्हमेंट – सम्यक संस्था व "आम्ही भारताचे लोक" चळवळीचे संयुक्त आयोजन

# छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त मोफत महाआरोग्य शिबिर!

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**मुंबई :** बहुजन प्रतिपालक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक बांधिलकी जपत इंडियन सोशल मूव्हमेंट – सम्यक संस्था तसेच "आम्ही भारताचे लोक" आंबेडकरी सांस्कृतिक चळवळ यांच्या वतीने भव्य मोफत महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

रविवार, दि. २२ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० ते सायं. ४ या वेळेत समाज मंदिर, मुकुंद नगर, उल्हासनगर-१ येथे हे शिबिर पार पडणार आहे. सर्वसामान्य व गरजू नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा मोफत उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

या महाआरोग्य शिबिरासाठी सेवाधाम हॉस्पिटल, एम्स हॉस्पिटल, अल्केम लाईफ तसेच श्यामन कॅन्सर केअर यांचे सहकार्य लाभले आहे. नामांकित तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली विविध आजारांची तपासणी व उपचारांसाठी नोंदणी करण्यात येणार आहे. शिबिरात अँजिओग्राफी, अँजिओप्लास्टी, बायपास सर्जरी संदर्भातील सल्ला, फ्रॅक्चर व हाडांचे उपचार मार्गदर्शन, डायलिसिस नोंदणी, कॅन्सर तपासणी व सल्ला, मधुमेह (RBD) तपासणी, ईसीजी (ECG), रक्तदाब तपासणी, डोळ्यांची तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी नोंदणी, श्रवण तपासणी, Sp02 (ऑक्सिजन लेव्हल) तपासणी तसेच फुफ्फुस व सांधेदुखी तपासणी आदी सुविधा उपलब्ध राहणार आहेत. गरजू नागरिकांना मोफत चष्म्यांचेही वाटप करण्यात येणार आहे.

सामाजिक आरोग्य जागरूकता वाढविण्यासाठी आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना वैद्यकीय मदत मिळावी या हेतूने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. शिवजयंतीनिमित्त आरोग्यसेवेचा संदेश देत "आरोग्य हेच खरे धन" ही संकल्पना रुजविण्याचा प्रयत्न आयोजकांकडून करण्यात येत आहे. या उपक्रमाचे नेतृत्व आनंदा होवाळ (संस्थापकीय अध्यक्ष, इंडियन सोशल मूव्हमेंट), मैत्रेय हयाळींग (संस्थापकीय अध्यक्ष, सम्यक संस्था), आयु. देवेन ज्योती वांझिरे कांबळे (सचिव, सम्यक संस्था) तसेच "आम्ही भारताचे लोक" आंबेडकरी सांस्कृतिक चळवळ टीम करत आहेत. आयोजकांच्या वतीने उल्हासनगर व परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या महाआरोग्य शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. शिवजयंतीचा उत्सव सामाजिक बांधिलकी व आरोग्यसेवेच्या माध्यमातून साजरा करण्याचा हा उपक्रम निश्चितच समाजासाठी प्रेरणादायी ठरणार आहे.न

**मोफत महाआरोग्य शिबिर**

- दिनांक: रविवार, २२ फेब्रुवारी २०२६
- वेळ: सकाळी १० ते सायं. ४
- स्थळ: समाज मंदिर, मुकुंद नगर, उल्हासनगर-१
- उपलब्ध सुविधा:
- अँजिओग्राफी / अँजिओप्लास्टी / बायपास सल्ला
- मधुमेह (RBD), रक्तदाब, ECG तपासणी
- कॅन्सर तपासणी व सल्ला
- डायलिसिस नोंदणी
- हाडे व फ्रॅक्चर उपचार मार्गदर्शन
- डोळे तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया नोंदणी
- श्रवण तपासणी
- Sp02 (ऑक्सिजन लेव्हल) तपासणी
- फुफ्फुस व सांधेदुखी तपासणी
- गरजूंना मोफत चष्मा वाटप

# २३ फेब्रुवारीला पिंपरी-चिंचवड शहराचा संध्याकाळचा पाणीपुरवठा पूर्णतः बंद

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** निगडी येथील जलशुद्धीकरण केंद्रावरील नियोजित देखभाल व दुरुस्तीच्या कामांमुळे सोमवार, दिनांक २३ फेब्रुवारी २०२६ रोजी पिंपरी-चिंचवड शहरातील संध्याकाळचा पाणीपुरवठा पूर्णतः बंद राहणार आहे, अशी माहिती महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने दिली आहे.

सेक्टर क्रमांक २३ येथील स्थापत्य व विद्युत विषयक कामे तसेच क्षेत्रीय स्तरावरील पाणीपुरवठा वितरण व्यवस्थेतील आवश्यक देखभाल दुरुस्ती हाती घेण्यात येणार आहे. पाणीपुरवठा व्यवस्थेत कोणताही मोठा बिघाड होऊ नये आणि भविष्यातील अडचणी टाळण्यासाठी ही कामे नियमितपणे करणे आवश्यक असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. या पार्श्वभूमीवर २३ फेब्रुवारी रोजी निगडी जलशुद्धीकरण केंद्रावरून होणारा पाणीपुरवठा पूर्णपणे बंद ठेवण्यात येणार आहे. तसेच या कामांचा परिणाम म्हणून मंगळवार, २४ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळचा पाणीपुरवठा कमी दाबाने व अनियमित होण्याची शक्यता आहे. नागरिकांनी पाणीपुरवठा बंद कालावधीत आवश्यक तेवढा पाणीसाठा करून काटकसरीने वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. देखभाल दुरुस्तीची कामे वेळेत पूर्ण करून पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील असल्याचे अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे यांनी सांगितले. तात्पुरत्या अडचणीबाबत नागरिकांनी सहकार्य करावे, असेही महानगरपालिकेच्या वतीने आवाहन करण्यात आले आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) I **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### लोणी स्टेशन चौकात भरधाव कारची धडक; महिला गंभीर जखमी

**लोणी काळभोर :** पुणे-सोलापूर महामार्गावरील लोणी काळभोर येथील लोणी स्टेशन चौकात भरधाव कारने रस्ता ओलांडणाऱ्या रेखा प्रकाश दवे यांना जोरदार धडक दिली. त्या गंभीर जखमी असून त्यांच्यावर विश्वराज हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. नागरिकांनी तत्काळ मदत करत चालकाला थांबवले. या प्रकरणी लोणी काळभोर पोलिस स्टेशन अभिषेक महादेव कांबळे याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता व मोटार वाहन कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### उरुळी कांचनमध्ये कराटे यलो बेल्ट परीक्षेचा उत्साह

**उरुळी कांचन :** (ता. हवेली) येथील उन्नती कन्या विद्यालयात कराटे यलो बेल्ट परीक्षा उत्साहात पार पडली. प्रशिक्षिका शितल कांचन यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या परीक्षेत USKA संस्थेचे अध्यक्ष रेन्शी संजय स्टेट, सुवर्णपदक विजेत्या रेन्शी आरती मोहित मल्ला व शिशान गणेश अहिरकर उपस्थित होते. त्यांच्या हस्ते 43 विद्यार्थिनींना यलो बेल्ट प्रदान करण्यात आला.

### रमजानपूर्वी खजूर-फळांना मोठी मागणी

**लोणी काळभोर :** दि. १९ फेब्रुवारीपासून पवित्र रमजान महिन्याची सुरुवात होताच बाजारपेठेत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. रोजाच्या पार्श्वभूमीवर खजूर, फळे व बेकरी पदार्थांना मोठी मागणी वाढली आहे. आजवा खजूर १२०० रुपये किलो, कलमी १००० रुपये किलो दराने विक्री होत असून इतर खजूर ३०० ते १२०० रुपये किलो उपलब्ध आहेत.

---

**सुनेत्रा पवारांना धक्का, माईकवर ताबा आणि प्रोटोकॉल भंग; शिवनेरीवरील व्हिडिओने राजकीय चर्चा**

# मुख्यमंत्री समोर असतानाच भाजप नेत्याचा 'स्टंट'?

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**जुन्नर :** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त किल्ले शिवनेरी येथे आयोजित राज्यस्तरीय शासकीय कार्यक्रमात घडलेल्या एका प्रसंगामुळे महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात आणि सोशल मीडियावर जोरदार खळबळ उडाली आहे. भाजपच्या नेत्या आशा बुचके यांच्या कथित वर्तनावरून प्रोटोकॉल भंग झाल्याचा आरोप होत असून, संबंधित व्हिडिओ सध्या मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत आहे.

या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार तसेच आमदार शरद सोनवणे उपस्थित होते. शिवजयंतीसारख्या अत्यंत ऐतिहासिक, भावनिक आणि संवेदनशील कार्यक्रमात शासकीय शिष्टाचार व राजकीय प्रोटोकॉलचे काटेकोर पालन अपेक्षित असते. मात्र याच कार्यक्रमात घडलेल्या एका घटनेमुळे वादाला तोंड फुटले आहे.

**माईक हिसकावल्याचा आरोप**

मराठा सेवा संघाच्या अभिवादन सभेदरम्यान आमदार शरद सोनवणे भाषण करत असताना, आशा बुचके यांनी त्यांच्या हातातून माईक घेत थेट भाषण सुरू केल्याचे दृश्य व्हिडिओत स्पष्टपणे दिसत आहे. यावेळी व्यासपीठावर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार उपस्थित असताना, त्यांच्यापूर्वी परवानगीशिवाय भाषण सुरू करणे हे राजशिष्टाचाराच्या विरोधात असल्याची तीव्र टीका राजकीय निरीक्षकांकडून होत आहे.

**पालखी सोहळ्यात 'धक्का' आणि फोटोसाठी घाई?**

याच कार्यक्रमातील पालखी सोहळ्यादरम्यान पुढे जाताना आशा बुचके यांनी सुनेत्रा पवार यांना धक्का दिल्याचा आरोपही सोशल मीडियावर होत आहे. तसेच 'पाळणा' म्हणणाऱ्या महिलेला बाजूला सारून त्या थेट मुख्यमंत्र्यांसमोर उभ्या राहत फोटो काढण्याचा प्रयत्न करत असल्याचे दृश्यही व्हिडिओत दिसते.

या प्रसंगानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हातवारे करून नाराजी व्यक्त केल्याचे स्पष्ट दिसते. त्यानंतर आशा बुचके यांनी आपले भाषण आटोपते घेतल्याचेही व्हिडिओत नोंदवले गेले आहे.

**सोशल मीडियावर प्रतिक्रिया, राजकीय वर्तुळात खळबळ**

हा प्रकार व्हायरल झाल्यानंतर सोशल मीडियावर विविध प्रतिक्रिया उमटत आहेत. काहींनी या वर्तनावर तीव्र टीका करत 'प्रोटोकॉलचा भंग' आणि 'स्वतःची प्रसिद्धी मिळवण्याचा प्रयत्न' असा आरोप केला आहे. तर काही समर्थकांकडून याचे समर्थनही केले जात आहे. मीम्स, टीकात्मक पोस्ट्स आणि चर्चांमुळे हा विषय सध्या चांगलाच तापला आहे.

**सार्वजनिक शिष्टाचाराचा प्रश्न**

शिवजयंतीसारख्या ऐतिहासिक आणि प्रेरणादायी कार्यक्रमात राजकीय नेत्यांचे वर्तन हे समाजासाठी आदर्श ठरावे, अशी अपेक्षा असते. त्यामुळे हा प्रसंग केवळ वैयक्तिक वादापुरता मर्यादित न राहता सार्वजनिक आचारसंहिता, राजकीय संस्कार आणि प्रतिमेच्या जबाबदारीचा गंभीर प्रश्न ठरला आहे. या घटनेवर संबंधितांकडून अधिकृत प्रतिक्रिया काय येते, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

---

## गोद्रे येथे श्री हटकेश्वर ज्येष्ठ नागरिक संघाचा उत्साहपूर्ण मेळावा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

संघविस्तार, आरोग्य प्रश्न आणि पेन्शन योजनेसाठी ठराव; १२५ सदस्यांची उपस्थिती

**जुन्नर :** मौजे गोद्रे येथे श्री हटकेश्वर ज्येष्ठ नागरिक संघाचा मेळावा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. मेळाव्याचे आयोजन जुन्नर तालुका ज्येष्ठ नागरिक शिखर समितीचे अध्यक्ष किसन रामभाऊ आरोटे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. गावातील ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून संघटनात्मक ऐक्याचे दर्शन घडविले.

मेळाव्याचे अध्यक्षस्थान भीमा ठमा रेंगडे यांनी भूषविले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक धोंडू तुकाराम रेंगडे यांनी करत मेळाव्याचा उद्देश स्पष्ट केला. त्यानंतर संहितेनुसार प्रार्थना घेण्यात आली आणि उपस्थित मान्यवरांनी मार्गदर्शन केले.

मेळाव्यात संघाच्या विविध अडीअडचणींवर सविस्तर चर्चा करण्यात आली. नवीन व आजीव सभासद नोंदणी वाढविणे, संघविस्ताराची दिशा ठरविणे तसेच ज्येष्ठांच्या आरोग्यविषयक समस्या यावर विचारमंथन झाले. शासनाच्या विविध योजनांमध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी वयोमर्यादा ६५ ऐवजी ६० वर्षे करण्यात यावी, असा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला. तसेच ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र पेन्शन योजना प्रभावीपणे लागू करण्यासाठी अर्ज भरून घेऊन ते तालुकास्तरावर सादर करण्याचा निर्णय घेण्यात आला.

संघाचे सचिव यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या पदावर किसन देवजी तळपे यांची नियुक्ती करण्यात आली. बँक व्यवहार करण्यासाठी अधिकृत परवानगी देत त्यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात आली. सुमारे १२५ ज्येष्ठ सदस्यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या मेळाव्यात एकजूट, सहभाग आणि सकारात्मकतेचे वातावरण पाहायला मिळाले. शेवटी पसायदानाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

---

# पुणे येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन

**२२ फेब्रुवारी रोजी बाजीराव रोडवर विविध वैद्यकीय चाचण्या; सुमारे १३,५०० रुपयांच्या सेवा पूर्णतः विनामूल्य**

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**पुणे :** नागरिकांच्या आरोग्य संवर्धनासाठी रुद्रांग वाद्यपथक ट्रस्ट, पुणे यांच्या पुढाकाराने आणि अखिल बाजीराव रोड रामनवमी उत्सव समिती ट्रस्ट, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी, दि. २२ फेब्रुवारी २०२६ रोजी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत नुमवी शाळेसमोर, बाजीराव रोड, लोखंडे तालीम चौक येथे पार पडणार आहे.

मंत्री (उच्च व तंत्रशिक्षण, संसदीय कार्य), महाराष्ट्र राज्य तथा कोथरूड विधानसभा मतदारसंघाचे आमदार चंद्रकांत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आणि समर्थ युवा फाउंडेशन यांच्या माध्यमातून हे शिबिर आयोजित करण्यात येत आहे.

या शिबिरात सर्वसाधारण आरोग्य तपासणी व उपचार, रक्तातील साखरेची तपासणी (BSL-R), रक्तगट, रक्तदाब, कोलेस्टेरॉल तसेच रक्तातील घटकांची (HB, RBC, WBC, PLT) तपासणी केली जाणार आहे. याशिवाय दंत तपासणी, कीड काढणे, सिमेंट भरणे, स्केलिंग व पॉलिशिंग या दंतसेवाही उपलब्ध असतील.

४० वर्षांवरील नागरिकांसाठी मोतीबिंदू व काचबिंदू तपासणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. महिलांसाठी ४० ते ६० वयोगटातील स्तन कर्करोग तपासणी (मॅमोग्राफी) विशेषतः मोफत केली जाणार आहे. तसेच महिलां व पुरुषांसाठी जवळच्या दृष्टीसाठी मोफत चष्म्यांचे वाटप करण्यात येणार आहे.

सुमारे १३,५०० रुपयांपर्यंतच्या विविध आरोग्य तपासण्या पूर्णतः मोफत उपलब्ध करून देण्यात येत असल्याने या शिबिराला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. वाढत्या आरोग्य समस्यांच्या पार्श्वभूमीवर नियमित तपासणीचे महत्त्व लक्षात घेता हे शिबिर नागरिकांसाठी मोठी संधी ठरणार आहे. अधिक माहितीसाठी सुमित कुंभार (९५२९२३९६२८) किंवा ओमकार नवले (८३०८७६०९८५) यांच्याशी संपर्क साधावा, असे आयोजकांनी कळविले आहे.

---

# महाशिवरात्री यात्रेत लोणी येथे ३५० बैलगाड्यांची थरारक शर्यत

**तब्बल २ लाख ७५ हजार १११ रुपयांचे बक्षीस**

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**लोणी-धामणी :** ता. आंबेगाव येथील लोणी गावात महाशिवरात्री यात्रेनिमित्त आयोजित दोन दिवसीय बैलगाडा शर्यतींना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या पारंपरिक स्पर्धेत तब्बल ३५० बैलगाडा मालकांनी सहभाग घेतला होता. गावच्या यात्रेला यंदा विशेष रंगत चढली असून एकूण २ लाख ७५ हजार १११ रुपयांचे रोख इनाम तसेच आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आली होती.

अत्यंत चुरशीच्या झालेल्या स्पर्धेत प्रथम क्रमांकाचा फळीफोडीचा मान बबलू संजय पोखरकर (वडगावपीर) व कचरू रामभाऊ पानमंद (चांडोह) यांच्या बैलगाड्यांनी पटकावला. द्वितीय क्रमांक मित्रप्रेम बैलगाडा संघटना (शिरदाळे) व बाळासाहेब मनाजी मांदळे (वाफगाव) यांनी मिळवला. तृतीय क्रमांक शुभम शाम शेळके (पाबळ) व दीपक सुरेश खैरे (हिवरे) यांच्या गाड्यांना मिळाला, तर चतुर्थ क्रमांक तन्वी बिल्डर बाबूशेट आदक (मांदळेवाडी) व आप्पा बबन मांदळे (मांदळेवाडी) यांच्या गाड्यांनी पटकावला.

---

# सामाईक जागेत माती टाकण्यावरून लोणी काळभोरमध्ये दोन कुटुंबांत हाणामारी!

**माजी उपसरपंचासह सहा जणांवर परस्परविरोधी गुन्हे**

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी काळभोर :** सामाईक मोकळ्या जागेत माती टाकण्याच्या किरकोळ कारणावरून दोन नातेवाईक कुटुंबांमध्ये झालेला वाद थेट हाणामारीपर्यंत पोहोचल्याची घटना लोणी काळभोर येथील पांढरी रोड परिसरात बुधवारी (ता. १८) सकाळी सुमारे अकराच्या सुमारास घडली. या प्रकरणी महिलांना मारहाण, दगडाने हल्ला, दागिने तुटणे व ठार मारण्याच्या धमक्या दिल्याचा आरोप असून, सहा जणांविरुद्ध परस्परविरोधी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

लोणी काळभोर स्टेशन येथे दोन्ही बाजूंच्या तक्रारींवरून गुन्हे नोंदविण्यात आले. सिम्पल गणेश कांबळे (वय ३२) यांच्या फिर्यादीनुसार मिलिंद भास्कर कांबळे व करिष्मा मिलिंद कांबळे यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. तर करिष्मा कांबळे (वय ३६) यांच्या तक्रारीनुसार माजी उपसरपंच गणेश तात्याराम कांबळे, सुनंदा कांबळे, सिम्पल कांबळे व मोनू गौतम कांबळे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सामाईक जागेत माती टाकण्यावरून दोन्ही कुटुंबांत आधीपासून वाद सुरू होता. बुधवारी पुन्हा माती टाकल्याने वाद चिघळला. करिष्मा कांबळे यांच्या म्हणण्यानुसार, त्यांच्या घरी येऊन शिवीगाळ व मारहाण करण्यात आली. त्यांनी घरात आश्रय घेतल्यानंतरही मागे जाऊन दगडाने मारहाण केल्याचा आरोप आहे. या झटापटीत त्यांचे सुमारे दहा ग्रॅम वजनाचे मंगळसूत्र तुटून काही भाग गहाळ झाल्याचे सांगण्यात आले आहे.

दुसरीकडे, सिम्पल कांबळे यांच्या तक्रारीनुसार, सुनंदा कांबळे यांनी जाब विचारल्यानंतर मिलिंद व करिष्मा कांबळे यांनी शिवीगाळ व धक्काबुक्की केली. भांडणात सिम्पल यांच्या गळ्यातील एक तोळ्याची सोन्याची चैन तुटल्याचे नमूद करण्यात आले आहे. गणेश कांबळे यांच्यावर दगडफेक झाल्याचाही आरोप आहे. परिसरातील नागरिकांनी हस्तक्षेप करून वाद निवळवला.

---

## आळंदीत संत निरंकारी मिशनचा 'प्रोजेक्ट अमृत'

**आळंदी :** जलसंवर्धनाच्या दिशेने भक्कम पाऊल टाकत संत निरंकारी मिशनच्या वतीने 'प्रोजेक्ट अमृत' अंतर्गत 'स्वच्छ जल, स्वच्छ मन' अभियानाचा चौथा टप्पा रविवारी (दि. २२) सकाळी ८ ते ११ या वेळेत राबविण्यात येणार आहे. परम श्रद्धेय सुदीक्षाजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली देशभरातील सुमारे १५०० ठिकाणी हा उपक्रम एकाच वेळी होणार आहे.

पुणे जिल्ह्यात इंद्रायणी नदीसह मुळा, मुठा, भीमा आदी नद्यांवर आणि ४२ ठिकाणी स्वच्छता मोहीम राबवली जाणार आहे. २०२३ मध्ये संस्कृती मंत्रालयाच्या सहकार्याने सुरू झालेला हा उपक्रम जलस्रोतांचे संरक्षण, जनजागृती आणि सेवाभाव वाढविण्यावर केंद्रित आहे. नागरिकांनी या अभियानात सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

---

# केंद्र क्र. १३८५ वर एस.एस.सी. परीक्षा सुरळीत सुरू

**गाडगे महाराज विद्यालय, ओतूर येथे ७८४ विद्यार्थ्यांची नोंद**

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**ओतूर :** मार्च २०२६ मधील एस.एस.सी. परीक्षेला ओतूर येथील गाडगे महाराज विद्यालय ओतूर केंद्र क्रमांक १३८५ वर उत्साहात आणि शिस्तबद्ध वातावरणात सुरुवात झाली. या केंद्रावर एकूण ७८४ विद्यार्थी प्रविष्ट झाले असल्याची माहिती केंद्र संचालक संपत माने यांनी दिली.

उद्घाटनप्रसंगी ओतूर पोलिस स्टेशन चे पोलिस उपनिरीक्षक युवराज जाधव, पोलिस हवालदार देविदास खेडकर व नरेंद्र गोराने उपस्थित होते. तसेच साखर कारखाना संचालक धनंजय डुंबरे, ह.भ.प. सर्जेराव महाराज गाढवे, ग्राम विकास मंडळाचे सचिव प्रदीप गाढवे, सहसचिव पंकज घोलप, तंटामुक्ती अध्यक्ष अनुराग फापाळे, चैतन्य विद्यालयाच्या



मुख्याध्यापिका राजश्री भालेकर, शालेय व्यवस्थापन समिती सदस्य नितीनदादा पाटील, अरुण वाकचौरे आदी मान्यवर व मोठ्या संख्येने पालक उपस्थित होते.

केंद्रावर ३२ ब्लॉकची व्यवस्था करण्यात आली असून प्रत्येक कक्षात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. पंखे, प्रकाशयोजना आणि इतर मूलभूत सुविधा उत्तम प्रकारे उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. अनेक वर्षांपासून हे केंद्र "कॉपीमुक्त केंद्र" म्हणून ओळखले जाते. १३ शाळांमधील पर्यवेक्षकांचे सहकार्य लाभत असल्याचेही माने यांनी सांगितले.

परीक्षेचा पहिला पेपर मराठी विषयाचा होता. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रदीप गाढवे यांनी "विद्यार्थ्यांनी भीती न बाळगता आत्मविश्वासाने पेपर लिहावा," असे आवाहन केले. धनंजय डुंबरे यांनी वर्षभराच्या अभ्यासावर विश्वास ठेवून शांत व निर्भय वातावरणात परीक्षा द्यावी, असे सांगितले. पोलिस उपनिरीक्षक युवराज जाधव यांनी पालकांना विद्यार्थ्यांना कोणतीही वाहने देऊ नयेत तसेच गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन केले.

संपूर्ण परीक्षा प्रक्रियेसाठी पोलिस प्रशासनाचे सहकार्य लाभत असून विद्यार्थ्यांना सुरक्षित आणि पारदर्शक वातावरणात परीक्षा देता यावी, यासाठी सर्व यंत्रणा सज्ज असल्याची माहिती केंद्र संचालकांनी दिली.

---

**महाराष्ट्राच्या संस्कृतीचे दिमाखदार दर्शन**

# किल्ले शिवनेरीवर चिमुकल्यांचा लेझीम जल्लोष!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

शासकीय शिवजयंती सोहळ्यात जि.प.प्रा. शाळा ओतूर नं. १ च्या विद्यार्थ्यांनी मान्यवरांची मनं जिंकली

**ओतूर :** छत्रपती शिवाजी महाराजांची जन्मभूमी असलेल्या ऐतिहासिक किल्ले शिवनेरी येथे आयोजित शासकीय शिवजयंती सोहळा यंदा विशेष रंगतदार ठरला. या भव्य सोहळ्यात जि.प.प्रा. शाळा ओतूर नंबर एकच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या लेझीम प्रात्यक्षिकाने उपस्थितांची मने जिंकली. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि शैक्षणिक वारशाचे जिवंत दर्शन घडवणाऱ्या या सादरीकरणाने संपूर्ण परिसर दणाणून गेला.

लेझीमच्या तालावर पारंपरिक पोशाखात सजलेल्या विद्यार्थ्यांनी अत्यंत शिस्तबद्ध आणि उत्साहपूर्ण सादरीकरण केले. ढोल-ताशांच्या गजरात आणि 'जय भवानी, जय शिवाजी'च्या घोषणांनी वातावरण भारावून गेले. लहानग्यांच्या समन्वय, तालबद्ध हालचाली आणि आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणाने मान्यवरांसह उपस्थित शिवभक्तांची विशेष दाद मिळवली.

या कार्यक्रमाला राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्राताई पवार, सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार, आमदार शरददादा सोनवणे, गटशिक्षणाधिकारी अशोक लांडे, विस्ताराधिकारी व्ही. आर. धोंडगे, केंद्रप्रमुख कमलाकांत मुंढे आदी



मान्यवर उपस्थित होते. विद्यार्थ्यांचे सादरीकरण पाहून मान्यवरांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांचे कौतुक केले.

शिवजयंतीच्या पवित्र निमित्ताने शिवनेरीच्या ऐतिहासिक भूमीवर सादर झालेल्या या लेझीम प्रात्यक्षिकामुळे उपस्थितांना महाराष्ट्राच्या परंपरेचा आणि संस्कृतीचा अभिमान वाटला. शिवभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. प्रेक्षकांकडून मिळालेल्या टाळ्यांच्या गजरामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास अधिकच वाढल्याची माहिती मुख्याध्यापिका सीमा डुंबरे यांनी दिली. या लेझीम पथकाला वनिता जाधव, सुदेष्णा गाढवे आणि उषा भवारी यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच माधुरी शेटे, सतीश नलावडे, ज्योती शिरसाट, रूपाली गायकर, योगिता बुट्टे, संगीता ढाकणे यांच्यासह शाळा व्यवस्थापन समितीचे नितीन डुंबरे, डॉ. वैभव गायकर, नितीन पानसरे, जितेंद्र घुले, तुषार डुंबरे, कविता डुंबरे, प्रतीक्षा ढोकळे, पूजा दिवेकर, सुपेकर, मुंढे, जि.प. सदस्य छायाताई तांबे, पंचायत समिती सदस्य प्रशांत डुंबरे व संतोष डुंबरे यांचे विशेष सहकार्य लाभले.

---

## लोहिया उद्यानाजवळील मजूर वसाहतीत भीषण आग

**१९ झोपड्यांसह गाड्या जळून खाक**

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** राम मनोहर लोहिया उद्यान परिसरातील मजुरांच्या वसाहतीत शनिवारी मध्यरात्री लागलेल्या आगीत १९ झोपड्या आणि तीन दुचाकी जळून खाक झाल्या. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही; मात्र अनेक कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त झाले आहेत.

पुणे-सोलापूर रस्त्यालगत असलेल्या या उद्यानाच्या मागील बाजूस बांधकाम मजूर आणि स्थलांतरित कामगारांची तात्पुरती वसाहत आहे. बांबू, लाकूड आणि पत्र्यांच्या साहाय्याने उभारलेल्या या झोपड्यांमध्ये वीजजोडणी अनधिकृत व असुरक्षित असल्याची प्राथमिक माहिती आहे. शनिवारी पहाटे अडीचच्या सुमारास एका झोपडीतून आग भडकली. गॅस सिलिंडर, स्टोव्ह किंवा शॉर्टसर्किट यापैकी कोणते कारण असावे, याबाबत तर्क लावले जात असले तरी अधिकृत कारण स्पष्ट झालेले नाही.

झोपड्यांमध्ये घरगुती सामान, धान्य, कपडे आणि ज्वलनशील साहित्य मोठ्या प्रमाणावर साठवलेले असल्याने काही मिनिटांतच आगीने शेजारच्या झोपड्यांनाही वेढले. मध्यरात्रीचा काळ असूनही रहिवाशांनी प्रसंगावधान राखत कुटुंबीयांना बाहेर काढले. त्यामुळे संभाव्य मोठी दुर्घटना टळली.

